आर.सी.सी.नं.२५/२०२०
शासन वि. सचिन
निशाणी नंबर ३७

<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची जबानी</u>

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| नांव | : | संध्या गजेंद्र खैरे |
| वय | : | ३४ वर्षे, |
| धंदा | : | शेती |
| राहणार | : | गणेगाव ता. भूम, जि. उस्मानाबाद |

**<u>सरतपासणी सरकार पक्षातर्फे ॲड.ए.आर.देशमुख यांचेतर्फे:—</u>**

मी आरोपीस ओळखते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. दिनांक २३/१२/२०२१ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास राजेंद्र खैरे यांचे शेतात घडली. सकाळी ९ ते ९.३० च्या सुमारास मी, माझे पती शेतात गेलो होतो. माझे दिर राजेंद्र खैर व जाउ राणी खैरे १० च्या सुमारास शेतात आले. राजेंद्र खैरे व राणी खैरे यांनी दुपारी १२ पर्यंत द्राक्ष बागेवर फवारणी केली. त्यानंतर माझे दिर राजेंद्र खैरे आठवडा बाजारासाठी वालवड येथे गेले. जाउ राणी ही शेतात गवत कापत होती. त्यावेळी आरोपी हा राजेंद्र खैरे यांचे शेताकडे जाताना आम्ही त्यास पाहीले. त्यानंतर राणी हिचा ओरडण्याचा आवाज आला. त्यानंतर मी व माझे पती आवाजाच्या दिशेने गेलो असता, आम्ही पाहीले की आरोपी राणी खैरे हिस लाथाबुक्यानी मारहाण करीता होता, शिवीगाळ करीत होता. जीवे मारण्याची धमकी दिली. आम्ही तिथे गेलो असता आरोपी आम्हाला बगुन पळुन गेला. त्यावेळी माझी जाउ राणी हि चक्कर येउन खाली पडली. माझे पतीने राजेंद्र खैरे यांना फोन करुन घटनेबाबत सांगितले. त्यांनतर लगेच राजेंद्र खैरे हे गाडी घेउन शेतात आले. माझे जाउस सरकारी दवाखाना भूम येथे आणले. पोलिसांनी माझा जवाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री.पी.टी.गाढवे ॲड.:—</u>**

हे म्हणणे खरे नाही की, मी वरील सरतपासत सांगितल्यानुसार कोणतीही घटना घडलेली नाही. घटनेच्या दिवशी, घटना घडल्यानंतर पोलिसांची व माझी भेट झाली नव्हती. माझी व पोलिसांची भेट दिनांक २५/१२/२०२१ रोजी शेतात झाली. त्यानंतर माझी व पोलिसांची भेट झाली नाही. मी आरोपीस राजेंद्र खैरे यांचे शेतात जाताना पाहले तेंव्हा आमच्यात व आरोपीत अंदाजे अर्धा एकराचे अंतर होते. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र खैरे यांचे शेताच्या पलीकडे आरोपीचे शेत आहे. आम्ही घटनास्थळी पोहचलो तेंव्हा राणी खैरे व आमच्यात काहीही बोलणे झाले नाही. त्या चक्कर येउन पडल्या होत्या. माझे पतीकडे मोटारसायकल आहे त्या दिवशी आम्ही मोटारसायकल वरुन शेतात गेलो होतो. माझे पतीने राजेंद्र खैरे यांना फोन केल्यानंतर ते अर्धा तासात घटनास्थळी पोहचले. ते येताना जीप घेउन आले होते. जीपचा रंग पांढरा होता. मी राणी खैरे सोबत भूम पर्यंत आले होते. भूम येथील दवाखान्यात उपचार घेतल्यनंतर राणी हिस जगदाळे मामा हॉस्पीटल बार्शी येथे नेण्यात आले होते. त्यानंतर ८ ते १० दिवसानंतर माझी व माझे जावेची भेट झाली.

हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलत सास—याची शेती आरोपीच्या शेताच्या दक्षिण व उत्तर बाजुस देखील आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन माझे पतीस व दिरास खरेदी घ्यायची होती. ती जमीन आरोपीने खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमचा आरोपीवर राग होता. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना सांगितलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत/समक्ष

स्वाक्षरीत/-
(श्रीमती एस.जे.पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम

दिनांक:—१७/०३/२०२५.